DATE २५/११/२०२१

## मना सज्जना .....

एका हिंदी चित्रपटातले गाणे आहे:

तोरा मन दर्पण कहलाये। भले बुरे कर्मों को देखे और दिखाये।
मन दर्पण दिखाये। मन ही ईश्वर, मन ही पूजा।
मन सबका आधार ॥

खरच मन हे अदृश्य असुन त्याला अकरावे इंद्रिय मानले आहे. ५ कर्मेंद्रिय, ५ ज्ञानेंद्रिय, ११ व मन। शब्द, स्पर्श, रस, गंध हे शब्दाने जाणता येत नाही. त्याला आकार, उकार नाही. पण अवस्था मन जाणते. आपण जर मित्रमंडळीत विचारले कि तुझ्या आयुष्यातला महत्वाचा क्षण कोणता? तर ती व्यक्ती वेळ आणि वयोमाने उत्तर देतात. माझे शिक्षण पूर्ण सक्षमतेने झाले तो. एखादा सांगतो नोकरी लागली तो क्षण, दुसरा म्हणतो भरभराट झाली तो क्षण, नंतर माझे लग्न झाले तो क्षण. हे सर्व तो मनाच्या सक्षमतेने सांगतो. एखाद्याला भक्तिमार्गात सद्गुरूची भेट झाली त्यावेळची ईश्वराच्या निरनिराळ्या अवतारातील दर्शन ही सुध्दा मनाची स्थितंतरच आहे. रात्री झोप केव्हा लागली ते कळत नाही व सकाळी जाग आली लक्षात येत नाही. पण मनाचे जे २ प्रकार आहेत ① अंतर्मन ② बहिर्मन हे माणसाला सुप्त अवस्थेत ऊंच पर्वत, नद्या, खोल दरी सगळीकडे नेऊन आणतात. पण संत रामदासस्वामी, तुकाराम महाराज ह्यांनी तर उच्चकोटीत, त्यांची प्रिय अशी दैवत जाणून अनेक युगासाठी अभंग, मनाचे श्लोकांची रचना करून ठेवली आहे. कारण माणसाला सद्गतीचा मार्ग मिळावा, व मुक्तीचा मार्ग दाखवुन अनेक जन्म, मागचे व पुढचे ह्यापासुन सुटका कशी होईल? व जीवनाची सार्थकता कशी होईल? म्हणूनच मनानेच चारही मुक्ती दाखविल्या.

नुसत व्यक्तिगत प्रेम हे मृगजळ असते. राष्ट्रप्रेम हे जातपात न दाखवता ताठ मानेने जगायला शिकवते.

॥मन करा रे प्रसन्न, सर्व सिध्दीचे कारण॥
हेच खरे आहे.



आ.
सौ. अनघा आपटे
mb. 9156398897

सौ. अनघा आपटे